
शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
23 Jul 2026 - Page 4 - A




# सायबर सुरक्षा जनजागृती अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

▸▸ पाळधी, ता.धरणगाव । वार्ताहर

भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील विद्यालय, पाळधी येथे इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. कणखरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सत्रात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील विद्यार्थिनी साक्षी पाटील व विद्या सोनवणे यांनी Quick Heal Foundation च्या Cyber Warrior उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव याविषयी मार्गदर्शन केले.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या शेवटी मा. कणखरे सर यांनी मार्गदर्शकांचे आभार मानत विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल व्यवहार करण्याचे आवाहन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.